सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), वर्धा कार्यालयास इमारत, संदर्भ सेवा केंद्र, हॅनसन्स सभागृह बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः प्रशामा २०२६/प्र.क्र.१८९/पासु-२(ई.१६७७१७९)

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: १४ ऑगस्ट, २०२६

वाचा :

सहसंचालक आरोग्य सेवा, (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे-६ यांचे पत्र क्रमांक : जा.क्र.ससंआसे/ कुष्ठवक्षय/अनुदानशाखा/वर्धा/इमारतबांधकाम/कक्ष१०२/८९८९-९१/२६, दि, १४/०५/२०२६.

प्रस्तावना:

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) वर्धा कार्यालयास इमारत, संदर्भ सेवा केंद्र, हॅनसन्स सभागृह बांधकामाचे रु.११,०३,३२,०००/-इतक्या रकमेचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांनी तयार केले असून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर; मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर तसेच सहसंचालक, आरोग्य सेवा, (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे यांनी साक्षांकित केले आहे. त्यानुसार सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) वर्धा कार्यालयास इमारत, संदर्भ सेवा केंद्र, हॅनसन्स सभागृह बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) वर्धा कार्यालयास इमारत, संदर्भ सेवा केंद्र, हॅनसन्स सभागृह बांधकामाचे अंदाजपत्रक सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित आहे. त्यानुसार एकुण रु. ११०३.३२ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सोबत जोडण्यात आलेल्या Recapitulation sheet प्रमाणे खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) अटी व शर्ती :-

१) बांधकामाचे आराखडे हे सार्वजनिक बांधकाम विभाग/शासकीय इमारतीच्या अनुज्ञेय मानकास अनुसरुन असल्याची खातरजमा करावी. अशा नकाशांना व वास्तुमांडणी आराखडयास शासनाचे वास्तुशास्त्रज्ञ यांची मान्यता घेण्यात यावी.

२) बांधकाम करण्यापूर्वी विदयुतीकरणाच्या कामासाठी मुख्य अभियंता (विदयुत) व स्थापत्यांच्या कामासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) यांची तांत्रिक मंजुर घेण्यात यावी.

३) कामासाठी निविदा मागविण्यापूर्वी सदर कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

४) बांधकामासाठी उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययामधून सदर कामास निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर कामाची ई-निविदा करतांना कामाचे तुकडे न करता एकत्रित निविदा करण्यात यावी.

६) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

७) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाच्या किंमतीमध्ये अनावश्यक वाढ करण्यात येवू नये.

८) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

९) स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

१०) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

११) केंद्र शासनाकडून निर्गमित IPHS च्या २०२२ च्या मार्गदर्शक सुनचांनुसार अंदाजपत्रकामध्ये सुधारणा समाविष्ट करुन प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीच्या मर्यादेत राहून इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.

१२) क्षेत्रियस्तरावर सदर बांधकामाचा संबंधित सहसंचालक(पुणे)/उपसंचालक, आरोग्य सेवा व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा.

१३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी२०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करावी.

१४) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सुचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. उपरोक्त १ ते १४ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील.

४. सदर बांधकामावरील खर्च "राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मुख्य लेखाशिर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, मागणी क्रमांक आर-१, १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना (०१) (३७) राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम २२१० ०९४१ या उपशिर्षांतर्गत बाब क्रमांक-५३ मोठी बांधकामे" या बाबीखाली भागविण्यात यावा.

५. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), वर्धा कार्यालयास इमारत, संदर्भ सेवा केंद्र, हॅनसन्स सभागृह बांधकामासाठी लागणाऱ्या रक्कमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्वरीत शासनास सादर करावा.

६. सदर आदेश वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ येथील परिच्छेद क्र.१३४(१) अनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२, दि.२०.०९.२०१९ मधील भाग-१ उपविभाग-पाच, परिच्छेद क्र. १३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१४१४५३३६६५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADEEP PISE

Digitally signed by KAVITA PRADEEP PISE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=895D4DC43BA3105440C0329431446AE8333AB89578925B2D77D3806165DBD487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AEEF37624AA6E5EA1AAA99D244C6C2A5F135097E5C07486A35D423835B4EC728, cn=KAVITA PRADEEP PISE
Date: 2026.08.14 16:47:11 +05'30'

(कविता प्र. पिसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर.
५. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
६. सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे.
७. उप संचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर.
८. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर.
९. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, वर्धा.
१०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, जि. वर्धा.
१२. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (पासु-२).

Name of work	CONSTRUCTION OF OFFICE OF ASSISTANT DIRECTOR, HEALTH SERVICES (LEPROSY), DISTRICT LEPROSY REFERRAL CENTRE AND TB HOSPITAL AT WARDHA					
	RECAPITULATION SHEET					
Sr. No	Particular of scope		Norms (Unit / Rate Rs. Per sqmt / Lump sum etc.)		Cost Rs. Cmponent wise	Total (Rs)
A	**ESSENTIAL ITEMS**					
1)	**a)Building Proper (Build up Area)**					
	i) Ground floor		840.660	Per Sqmt.	31,304.00	2,63,16,021.00
	i) First Floor		840.660	Per Sqmt.	26,260.00	2,20,75,732.00
	Total B.U.A		**1681.32**		**Sub Total (a)**	**4,83,91,753.00**
	b)Fuel Gas Pipeline			Lump Sum		-
	c)Biodigester			Lump Sum		-
2)	**Water Supply and sanitary works**		5% of (a)	5%	4,83,91,753.00	24,19,588.00
3)	**a) Electrification**	**Internal**	As per Electrical Recap Sheet attached Seperately			
		External	As per Electrical Recap Sheet attached Seperately			
					Sub Total (3a)	**-**
	b) Other Electirical Items	As per Electrical Recap Sheet attached Seperately				
					Sub Total (3b)	**-**
					Total Electrical : Sub Total (3)=(3a) + (3b)	**-**
					Sub Total (A)=(1)+(2)+(3)	**5,08,11,341.00**
B)	**MISCELLANEOUS CIVIL ITEMS**					
	i)Compound Wall					
	ii) Internal Road (C.C.) / Pathway					
	iii) Retaining Wall					-
	iv) C.C. Drains		0.09	Per Km	55,72,320.00	5,01,509.00
	v)Furniture		1176.92	Per Sqmt	5,000.00	58,84,620.00
	vi)Land Development					
	vii)Dismantling		1.00	Lump Sum	3,00,000.00	3,00,000.00
	viii)Soil Investigation		1.00	Lump Sum	1,50,000.00	1,50,000.00
	ix)Underground rain water harvesting		1.00	Lump Sum	50,000.00	50,000.00
	x)Plinth Protection		1.00	Lump Sum	3,00,000.00	3,00,000.00
	xi) Elevation/ Facades					-
	xii) Landscaping/Gardening		1.00	Lump Sum	1,50,000.00	1,50,000.00
					Sub Total B	73,36,129.00
C)	**OPTIONAL ITEMS**					
	I)Water Main Stoarage etc.					-
	ii)External toilets					-
	iii)Sewage Treatment Plant					-
	iv)Sound Systems					-
	v)Borewell		1	Lump Sum	3,00,000.00	3,00,000.00
	vi)Parking Shed		1	Lump Sum	3,00,000.00	3,00,000.00
					Sub Total C	6,00,000.00
					Project Cost (P)=(A)+(B)+(C)	**5,87,47,470.00**
D)	**OTHER PROVISIONS**					
	i) Contingencies	add for 3% on (A)		3.00%	4,83,91,753.00	14,51,753.00
	II) Labour Insurance	add for 1% on (P)		1.00%	5,87,47,470.00	5,87,475.00
	III) Price escalation	add for 10% on (P)		10.00%	5,87,47,470.00	58,74,747.00

	iv) GST	add for 18% on (P)	18.00%	5,87,47,470.00	1,05,74,545.00
	v) Green Building (5%)	add for 5% on (A)	5.00%	4,83,91,753.00	24,19,588.00
	vi) Architecture services (2.0%) + PMC 2%	add for ~~2.0%~~ 4% on (P)	~~2.00%~~ 4%	5,87,47,470.00	~~11,74,949.00~~ 2349899.00
				Sub Total D	~~2,20,83,057.00~~ 23258007.00
	TOTAL CIVIL COST OF THE PROJECT (TPC)=(P)+(D)				~~8,08,30,527.00~~ 82005477.00
	TOTAL ELECTRICAL COST OF PROJECT (As per Electrical Recap Sheet of Seperately Attached)				2,83,27,000.00
	TOTAL CIVIL COST OF THE PROJECT (TPC)=(P)+(D)				~~10,91,57,527.00~~ 110332477.00
	Say Rs Lakhs				~~10,91,58,000.00~~ 110332500.00

i	Building Proper Cost	=	28,782.00	per Sqm
ii	Electric Work Cost	=	16,848.07	per Sqm
iii	Water Supply	=	1,439.10	per Sqm
iv	Total of i+ii+iii	=	47,069.17	per Sqm

ASSISTANT ENGINEER AE-I
P.W. SUB DIV. No. 1
WARDHA

EXECUTIVE ENGINEER
P. W. DIVISION
WARDHA

Superintending Engineer
Public Works Circle,
Chandrapur

Assistant Director,
Health Services (Leprosy)
WARDHA

[illegible]

This Estimate is prepared on the Block Estimate Rate for Year 2025/26 (SSR 22-23)
This recommendation is Valid for 1 Year or revision of Block Estimate Rates, whichever is earlier.

TECHNICAL APPROVAL

1. Estimate Technically Approved for Rs. 1103.32 lakh
(In Words Rs. Eleven crore three lakh thirty two thousand only.
2. Estimate Technically Approved [illegible] to this office Letter No._____ Dt._____
3. This Estimate is to be [illegible] Administrative Approval. For Execution of work, separate Detail Estimate Shall be Prepared and got approved from Competent Authority.
4. This Estimate is registered as T.A. No. 88/CE/TA/2025-26

CHIEF ENGINEER
Public Works Region, [illegible]

37